MHLA160000262020

**<u>नियमित फौजदारी खटला क्र.०६/२०२०</u>**

**<u>शासन वि. बबन</u>**

–:: **<u>नि.क्र.१ लगत आदेश</u>** ::–

मी प्रकरणाचे काळजीपूर्वक अवलोकन केले. पोलीस ठाणे अधिकारी पोलीस ठाणे देवणी यांनी दि.१३/०१/२०२० रोजी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४५४ व ३८० च्या गुन्ह्याकरिता दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. आरोपींना जामिनावर सोडलेले आहे आणि ते गैरहजर आहेत. त्यांना समन्सची बजावणी होत नाही. ते समन्सची बजावणी टाळत असल्याचे दिसून येते. प्रकरण फार जुने आहे. त्यामुळे कठोर आणि उचित कार्यवाही करणे आवश्यक आहे. प्रकरण विनाकारण लांबणीवर पडले. त्यांनी जामिनाच्या आदेशाप्रमाणे प्रकरणात हजर राहून ते पुढे चालविण्यास कसूर केलेला आहे. त्यांनी त्यांच्या जामीनबंधपत्राचा एक प्रकारे भंग केलेला आहे. सबब आरोपींविरुध्द गैरजमानती वॉरंट काढावे आणि त्यांच्या जामीनदारांना जामीनबंधपत्रे जप्त करून त्याची रक्कम वसूल का करू नये याबाबत कारणे दाखवा नोटीस काढावी.

०२. आदेश संगणकावर टंकलिखित केला आणि खुल्या न्यायालयात घोषित केला.

Digitally signed by SHARAD AWADHUTRAO SURJUSE
Date: 2026.08.06 13:29:29 +0530

**ठिकाण – देवणी** **( शरद अ. सुरजुसे )**

**दिनांक – ०६–०८–२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,**

**देवणी.**